**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेस नोट ता.३१/१०/२०२४

# चार वर्षा पासुन खुनाच्या गुन्हयातील फरार असलेल्या आरोपीस देशी बनावटीचे पिस्टलसह जेरबंद

## पिंपरी चिंचवड,गुन्हे शाखा,युनिट १ ची कारवाई.

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी अवैध अग्निशस्त्र विरोधी विशेष मोहिम राबवुन गुन्हेगारांची माहीती मिळवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे. गुन्हे शाखा युनिट -१ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत अवैध अग्निशस्त्र बाळगणा-या गुन्हेगारांची माहीती घेत असतांना दिनांक ३१/१०/२०२४ रोजी पोलीस अंमलदार सोमनाथ बो-हाडे व स्वप्निल महाले यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, एक इसम अवैध अग्निशस्त्र घेवुन मोहननगर,चिंचवड,पुणे या परिसरात येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदिप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड यांनी गुन्हे शाखा युनिट १ कडील स्टाफ यांचे दोन पथक तयार करुन मोहननगर,चिंचवड,पुणे येथे जावुन सापळा लावुन थांबलो असता बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचा इसम हा संघवी केशरी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे गेट जवळ,रस्त्याचेकडेला पुटपाथवर, मोहननगर, चिंचवड,पुणे संशयित रित्या थांबलेला दिसला असता युनिट १ चे स्टाफने सदर इसमास शिफारतीने पकडले. त्याचे नाव- सचिन दिवान राजोरिया ऊर्फ वाल्मिकी,वय ३४ वर्षे,रा.समता नगर,लोहगांव,पुणे मुळ रा.बॅरेक नं.११३२,इमली पाडा,फारवर लाईन,उल्हास नगर नं. ३,ठाणे असे असुन त्याचे अंग झडतीत एक देशी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत काडतुस असा एकुण ४१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत युनिट १ चे पोलीस अंमलदार स्वप्निल अशोक महाले यांनी सरकार तर्फे दिले फिर्यादीवरुन पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर

९९१/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९६२ चे कलम ३ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अभिलेख पडताळणी करुन पाहता आरोपी सचिन दिवान राजोरिया ऊर्फ वाल्मिकी,वय ३४ वर्षे,रा.समता नगर,लोहगांव,पुणे मुळ रा.बॅरेक नं.११३२,इमली पाडा,फारवर लाईन,उल्हास नगर नं. ३,ठाणे यांचे विरुध्द विठ्ठलवाडी पोलीस ठाणे, ठाणे शहर गु.रजि.नं.१९१/२०२० भादंवि कलम ३०२,३०७,३४ सह मपोका कलम ३७(१)१३५ असा गंभीर खुनाचा गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयात तो चार वर्षा पासुन फरार आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड, पोलीस अमंलदार सोमनाथ बोऱ्हाडे,मनोजकुमार कमले,गणेश महाडीक,सचिन मोरे यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड